**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वेव्हज् या जागतिक परिषदेचं मुंबईत उद्घाटन
- महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६५व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम
- पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी राज्य सरकार सर्व समाजघटकांना सोबत घेऊन प्रगती करत असल्याचा राज्यपालांनी व्यक्त केला विश्वास
- महाराष्ट्र आणि गुजरात स्थापनादिनानिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांच्या शुभेच्छा

**आणि**

- व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडरच्या किमतीत घट

**<><><><><>**

वेव्हज् हा फक्त एका परिषदेचं संक्षिप्त नाव नाही, तर खरोखर एक सांस्कृतिकतेची, सर्जनशीलतेची, जागतिक स्तरावर परस्परसंबंधांची लाट आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मुंबईत जिओ वर्ल्ड कन्वेन्शन सेंटर इथे सुरू असलेल्या वेव्हज् अर्थात जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

**होल्ड… बाईट - नरेंद्र मोदी (24 सेकंद)**

वेव्हज् हे एक असं जागतिक व्यासपीठ आहे. जे तुमच्यासारख्या प्रत्येक कलाकाराचं आहे. त्यामुळे प्रत्येक कलावंत सर्जनशीलतेच्या जगाशी जोडला

जाईल, असंही ते यावेळी म्हणाले. यावेळी मोदी यांनी ३२ विविध स्पर्धांमधून अंतिम फेरीत पोहोचलेल्या ८०० स्पर्धकांचं अभिनंदनही केलं.

प्रथमच भरणाऱ्या या परिषदेला परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. वेव्हज् परिषदेमुळे देशातल्या आशय निर्मात्यांना जगभरातल्या गुंतवणूकदारांशी संपर्क निर्माण करण्याची संधी मिळत आहे, असं मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. या परिषदेत देशातले ७६हून जास्त नेते आणि उद्योगक सहभागी होत असून यामुळे मनोरंजन आणि नवनिर्मिती क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर मुंबईचं स्थान बळकट व्हायला मदत होईल, असंही ते यावेळी म्हणाले. वेव्ह्ज ही केवळ एक परिषद नसून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली एक चळवळ असल्याची प्रतिक्रिया अभिनेता शाहरुख यांनी दिली आहे.

या परिषदेला चित्रपटसृष्टीतून शाहरुख खान, रजनीकांत, अक्षय कुमार, विकी कौशल, प्रसून जोशी, सारा अली खान, सैफ अली खान, दीपिका पदुकोण, शाहीद कपूर, बॉबी देओल, आमीर खान, आलिया भट, रणबीर कपूर, मनीषा कोईराला, नुसरत भरुचा, शोभिता धुलिपाला, अनिल कपूर, अनुपम खेर यांच्यासह मनोरंजन क्षेत्रातले अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रधानमंत्री मोदी आज केरळला जात असून, तिथं विळिंजम आंतरराष्ट्रीय बंदराचं लोकार्पण करणार आहेत. त्यानंतर आंध्र प्रदेशात अमरावती इथं ते ५८ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत. सात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५वा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. मुंबईत यानिमित्त झालेल्या कार्यक्रमांचा थोडक्यात आढावा आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड- कॅप्सूल- व्हॉईसकास्ट- तुषार( बाईट- मुख्यमंत्री)**

महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हामुख्यालयं, राज्यसरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालयं तसंच निमसरकारी संस्था आणि विविध राजकीय पक्षांच्या मुख्यालयांमधे महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदनेचे कार्यक्रम झाले.
दिल्लीच्या महाराष्ट्र परिचय केंद्रातही महाराष्ट्र दिन साजरा झाला.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्यस्थापना दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधाननमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.
गुजरात राज्याचा स्थापनादिनही आज साजरा होत आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्री तसंच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

जागतिक अर्थव्यवस्थेतलं कामगारांचं योगदान अधोरेखित करण्यासाठी आज कामगार दिन साजरा केला जातो. कामगारांचे कामाचे तास आठ तासापर्यंत मर्यादित करण्यासाठी अमेरिकेत झालेल्या आंदोलनापासून एक मे हा दिवस कामगार दिन म्हणून ओळखला जातो. जगभरातल्या कामगारांचे हक्क आणि कामगारांच्या पिळवणूकी विरोधातली आंदोलनं यांचं प्रतिनिधित्व करणारा हा दिवस, मे दिन म्हणूनही ओळखला जातो.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जागतिक कामगारदिनानिमित्त सर्व कामगारांना शुभेच्छा दिल्या आहेत. विकसित भारताचं स्वप्न साकार करणारे श्रमिक, आपले श्रम आणि समर्पण या माध्यमातून अर्थव्यवस्था मजबूत करत आहेत. कामगार हे राष्ट्रनिर्मितीचे सशक्त स्तंभ असल्याचं सांगून श्रमिकांचे कल्याण आणि समृद्धीसाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

26/11 च्या मुंबई हल्यातला आरोपी तहव्वूर राणा याच्या आवाजाच्या आणि हस्ताक्षराच्या नोंदी घेण्यासाठी दिल्लीच्या विशेष न्यायालयानं NIA अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेला परवानगी दिली आहे. राणाची कोठडी बारा दिवसांनी वाढवण्याचा आदेश सोमवारी न्यायालयानं दिला होता.

<><><><>

जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय हा सरकारने विचारपूर्वक घेतलेला असून तो सामाजिक न्यायाप्रति रालोआ सरकारची वचनबद्धता दर्शवतो, असं प्रतिपादन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. सर्व वर्गातल्या जनतेने पक्षीय राजकारणापलिकडे जाऊन या निर्णयाचं स्वागत केलं आहे, असंही प्रधान यावेळी म्हणाले. काँग्रेसने आदिवासी, दलित आणि मागासवर्गीयांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवल्याचा आरोप त्यांनी केला.

<><><><>

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स हा सामना जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडीयमवर रंगणार आहे. खेळ

संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. राजस्थान रॉयल्सकडून खेळणाऱ्या वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीकडे क्रिकेटरसिकांचं लक्ष असेल. अवघ्या १४ वर्षांच्या या फलंदाजाने गेल्या सामन्यात ३५ चेंडूत शतक ठोकलं होतं.

कालच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज संघाचा पंजाब किंग्ज इलेव्हन संघानं ४ गडी राखून पराभव केला. चेन्नईच्या १९० धावांना प्रत्युत्तर देताना पंजाबनं १९४ धावा केल्या. या पराभवामुळे चेन्नईचा संघ स्पर्धेतून पडणारा पहिला संघ ठरला आहे.

**<><><><><>**

इंधन कंपन्यांनी आज व्यावसायिक वापरासाठीच्या १९ किलो वजनी गॅस सिलेंडरच्या किमती कमी केल्या. मुंबईत या सिलेंडरचा दर आता १ हजार ७१३रुपये ५० पैशांऐवजी १ हजार ६९९ रुपये तर दिल्लीत १ हजार ७४७ रुपये ५० पैसै झाला आहे. घरगुती वापराच्या १४ किलो वजनी सिलेंडरच्या किमतीत मात्र कोणताही बदल केलेला नाही.

**//<><><><><>//**